# नियमित दरखास्त क्र.०६/२०२१ मधील निशाण क्र.१ खालील आदेश

[ CNR No.MHKO090003662020 ]

आजरोजी नि.१७ प्रमाणे प्रकरण बोर्डावर घेण्यात आले. दरखास्तदार गोविंद शिवपूत्र साखरे हे न्यायालयासमक्ष हजर असून त्यांनी असे कथन केले की, त्यांना प्रस्तुतच्या प्रकरणात दि.०७.०२.२०२५ ही तारीख देण्यात आली होती. तथापि, न्यायालयीन दिवाणी प्रकरणांची सुची यादी पाहिली असता त्यावर दि.२९.०१.२०२५ ही तारीख नमूद आहे. तसेच सदरील दिवशी प्रस्तुतच्या प्रकरणास दि.१०.०३.२०२५ ही तारीख नेमल्याचे दिसते. दि.२९.०१.२०२५ रोजीचा रोजनामा पाहता, दरखास्तदार यांचे विधीज्ञ सदरील दिवशी प्रकरणात हजर असल्याचे दिसते. जर सदरील विधीज्ञांनी तारखेसंदर्भात काही आक्षेप नोंदवायचा असता तर त्यांनी तो दि.२९.०१.२०२५ रोजी नोंदवणे अभिप्रेत होते. तथापि, सदरील दिवशी कुठल्याही प्रकारचा आक्षेप या प्रकरणात नोंदविण्यात आला नाही. तरी देखील दरखास्तदार यांनी केलेली विनंती लक्षात घेता, ऋणको यांच्या विधीज्ञास तारखेसंदर्भात नोटीस जारी करण्यात यावी व प्रस्तुतचे प्रकरण हे तारखेबाबत केलेल्या आक्षेपासंदर्भात दि.२०.०२.२०२५ रोजी नेमण्यात येत आहे.

Digitally signed by NARENDRA
Date: 2025.02.07 12:56:36 +0530

स्थळ : गडहिंग्लज.

दिनांक : ०७.०२.२०२५.

( न. श्री. पुरी )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
गडहिंग्लज